ISSN 2394-5303

# printing AREA

Issue-77, Vol-02 June 2021

International Peer reviewed Research Journal



Editor
Dr.Bapu G.Gholap

14) बदलती नीतीमूल्ये आणि स्त्रिया
प्रा.डॉ. कालिदास दिनकर फड, ता.जि. औरंगाबाद ||69

15) कोविड १९ चा मराठी साहित्यावरील परिणाम
प्रा.डॉ. भारती अशोक बेंडाळे, भुसावळ ||73

16) निकोलस मनूचीचे :स्तोरिओ दो मोगोर
प्रा.राजवीरेंद्रसिंग रुबजी गावीत, धुळे ||76

17) ग्रामीण आरोग्य आणि शासकीय योजना
डॉ.कु. दिपाली श्रीराम घोगरे, जि. अकोला ||79

18) प्रधानमंत्री किसान सन्मान निधी आणि वास्तवता
प्रो.डॉ. ए. डी. गोस्वामी, भुसावळ ||84

19) गणित अध्यापनात शैक्षणिक साधने वापरल्याने होणारा परिणाम
श्रीमती प्रभाबाई सर्जेराव पाटील, चाळीसगाव ||88

20) स्वातंत्र्य हा मोक्ष : पारतंत्र्य हा बंध
प्रा. डॉ. संजय जगताप, नांदेड ||92

21) आशय विस्ताराची मिताभिव्यक्ती : 'सूर्यफूल'
प्रा.डॉ. विनोद नामदेव इंगळे, जि. बुलढाणा ||94

22) मानवी जीवनातील दु:खभोगाचा तळ शोधणारी कादंबरी : 'नदीष्ट'
डॉ. कमलाकर चव्हाण, जि. हिंगोली ||99

23) ई डब्ल्यू एस आरक्षण आणि त्याचे परिणाम
डॉ. गजानन जी. हिवराळे, जि. वाशिम ||103

24) मन्नू भंडारी की कहानियों में स्त्री जीवन के विभिन्न पहलु
भारत भूषण, Vill- Kangri ||109

25) केदारनाथ अग्रवाल की कविताओं में प्रकृति—चित्रण
डॉ. गफार सिकंदर मोमीन, नांदेड (महाराष्ट्र) ||113

26) आधुनिक भारत के निर्माण में सहायक खादी उद्योग
डॉ० सुधीर कुमार विश्वकर्मा, बागपत, उ०प्र० ||115

27) भारत वर्ष के उ०प्र० में प्रागैतिहासिक काल की चित्रकला
डॉ० गुलाबधर, चित्रकूट (उ०प्र०) ||119

**21**

# आशय विस्ताराची मिताभिव्यक्ती : 'सूर्यफूल'

**प्रा.डॉ. विनोद नामदेव इंगळे**
ग. भि. मुरारका कला, वाणिज्य महाविद्यालय,
शेगाव, जि. बुलढाणा

*************

अंतर्मुखतेच्या स्पष्ट जाणिवा प्रसवणारी कविता ही समकालातील होणाऱ्या चिंतनप्रवाहाला मूल्यगर्भता प्राप्त करून देते, असे म्हणण्यापेक्षा तो तिचा एक स्वभावगुणच असतो. कारण, त्या चिंतन प्रक्रियेतील ती एक जागृतावस्था असते आणि ती ही जागृतावस्थाच तिचे स्वत्व जपण्याचा प्रयत्न करते. कविता ही कधी निसर्गाला, कधी प्रेमला, कधी समाजातील दाहकतेला, कधी राष्ट्राच्या चेहऱ्याला, कधी अगम्यतेला तर कधी स्वत:ला शोधता शोधता मानवी मनाच्या तळाला केवत घेवून गतिमान होते. तिच्यावर होणाऱ्या आघातांनी तिला गतिमान होणे अनिवार्यच असते. कारण प्रवश्त्तींच्या संघर्षाला समान न्याय देणे ही जबाबदारी कवितेला प्रत्येक कालखंडात पार पाडावी लागते. म्हणून तर ती भक्तीपासून मुक्तीपर्यंत भाष्य करू शकते. कारण प्रत्येक कालखंडातील सुख, दु:ख, आनंद, उदासिनता, भग्नता, संपन्नता, सहयोग, विरोध, नकार, होकार यांतून साकारणारी स्वाभाविकता ती व्यक्त करते. नाहक प्रतिमांच्या गलबत्याचा तिला उबग येतो, म्हणून ती माणसांच्या भाषेत माणसांना मांडू पाहते. कवी अंकुश वाघमारे यांच्या कवितेचा या संदर्भात विचार करता येतो. ही कविता कसलाही उसना अभिनिवेश बाळगत नाही, तर सहजता हे तिचे वेगळेपण ठरते. त्यांचा 'सूर्यफूल' हा जणू नवेपणाचा श्वास वाटावा, इतका त्याचा आविष्कार लोभसवाणा आहे.

'सूर्यफूल' या काव्यसंग्रहामध्ये एकूण साठ कवितांचा परिचय होतो. विषयांची विविधता हे या संग्रहाचे वैशिष्ट्य म्हणावे लागते. प्रत्येक कविता आपला एक वेगळा चेहरा घेवून पेश होते. काही मांडणे ही कवीची भूमिका दिसून येत नाही तर, प्रकटीकरणाशिवाय अस्वस्थ करून सोडते, त्याच्या आव्हानाला ती सामोरी जाते. एकाच वेळेस गतकाळाशी नाळ वर्तमानाला समजून भविष्याला आकार देवू पाहे. मातीशी असणारे नाते कवीला आपल्यापासून दूर करीत नाही. माती हा त्यांचा मूळ स्वभाव आहे. माती टिकली पाहिजे, पर्याने शेती पिकली पाहिजे, ही भावसंवेदना कवीची तगमग आणि हळवेपणा व्यवहारी दुनियेच्या पुढ्यात ठेवते. भकासतेतून सुंदरतेचा आणि सुंदरतेच्या शिवाचा ध्यास त्यांची कविता घेते. 'सुगी' ही कविता वैफल्यग्रस्त वर्तमानातून भविष्यातील भलेपणाच्या आशावादाला जिवंत करते.

**'चोहोकडे रे दिसती हसरे**
**रूप रानमळ्याचं**
**शेतकरी राजा आनंदिला**
**पहता स्वप्न सुगीचं' पृ. ४०**

जागतिकीकरणाने पराभूत होणारा शेतकरी व्यवहारी दुनियेत चिंतनाचा विषय होत नाही. या भयाण पर्यावरणाने कवी हताश न होता त्याच्या सामर्थ्याचे पोवाडे गातो आहे. तो त्याचा पाठीराखा म्हणून समोर येतो. त्याच्या असण्याची किंमत आणि नसल्याचे संपलेपण याचे पोक्त भान कवी ठेवून आहे. आपल्या अंतरंगाच्या कोपऱ्यात जपलेले हिरवे कंच पीक कवीच्या आनंदाच्या उधाणाला भरतं आणते. परंतु कवीला कोठेतरी त्याच्या अवहेलनची झळ बसते. तरीही जीवनाकडे पाहण्याचा सकारात्मक ओढा चिंतनीय वाटतो. सर्वच काही चांगलं संपत असते, यावर त्याचा विश्वास नाही. म्हणून त्यांची कविता सुगीचं स्वप्न मोठ्या सामर्थ्याने तोलून धरते. शेतकऱ्याला, त्याच्या भावजीवनाला काव्याचे रूप देऊन प्रश्न संपत नाही तर ते भावजीवनच भल्या बुऱ्या सहित त्यांच्या कवितेमध्ये 'सुगी' मध्ये उधाणून येते. या दृश्याला पाहता पाहताच शेतकऱ्याच्या जीवनाचा, त्यांच्या गरजांचा होणारा कोंडमारा कवीच्या दृष्टीतून सुटू शकत नाही म्हणून कवी 'तक्रार' घेऊन येतो.

**'याचनेच्या कागदावर नोंदविली तक्रार**

**मेघाच्या राजवाड्यात कोमेजली रोपटे**
**वाढीस लागावी म्हणून**
**गाऱ्याणी ऐकण्यास आले मोसमी वारे**
**आणि क्षणात निघून गेले आश्वासन देऊन'** पृ. ५७

आशाळभूत असणारे वातावरण तयार करणे आणि त्याला सहज तडा देणे यांची जणू पैदास अलिकडे होत आहे. माणूस हा जणू काही सहज फसविण्याची बाब आहे, अशी प्रवृत्ती, जागा तयार करतो आहे, मग विश्वासाची निर्माण झालेली पोकळी व्यक्तीला गुडूप करून टाकते. तक्रारीचा स्वर जेव्हाच की तेव्हा सर्वकाही अनुकूलतेच्या चेहऱ्याकडे वाकूल्या दाखविते. हीच तऱ्हा त्याला तक्रारीपर्यंत नेऊन सोडते. तक्रारीचा संबंध एकीकडे वाईटाशी झगडा व्यक्त करतो तर दुसरीकडे चांगुलपणाचे स्मरण करून त्याच्याशी अनुबंध जोडण्याचा प्रयत्न करतो. अवकाळी पावसात झोडपल्या गेलेला शेतकरी अस्मानी आश्वासनाच्या माऱ्याने वाचू शकत नाही. त्याच्या वाचण्याच्या साऱ्या शक्यता धूसर होऊन जातात. असे असुनही जगण्याचा बोहारा संघर्ष स्वस्थ बसू देत नाही. जीवनाचे हे करंटेपणच राजकीय पटलाकडे पाहून मुठी उगारते. माणूसपण जिवंत राहण्यासाठी धडपडतो. तो रानटी आणि मानवी प्रश्न एकाचवेळी निकाली निघावा यासाठी कवी वास्तवाला आपल्या कवितेचा विषय बनवितो. त्यांच 'सूर्यफूला'तून अनंत श्वासांना व्यक्त करण्याचे सामर्थ्य दिसून येते. कोणत्याही एकाच परिसराचा मक्ता घेवून त्याच्या पल्याडच्या वातावरणाची अवहेलना किंबहूना नजरचूक त्यांची कविता करीत नाही. त्याचे कारण कविचा सभोवताली प्रत्येक स्ताच्या जवळून असणारा वावर. पोटात खळबळ झाल्याशिवाय ओठांवर शब्दांनी आकार घेवू नये, असे वांझ शब्द त्यांच्या कवितेची गळचेपी करीत नाही. वांझपणा हे जीवनाचे खरेपण असूनही आपणास ते नाकारता येत नाही, तसेच ते पचवताही येत नाही. म्हणूनच त्याच्याशी चाललेला लढा मानवी अस्तित्वाची ओळख ठरतो. याचा जीवनाच्या प्राक्तनाशी संबंध लावणाऱ्यांच्या सावलीपासून वाघमारेंची कविता दूर राहते. कारण तिने आपल्या म्हणून जपलेल्या काही खुणा दिसून येतात. कारण ज्या माणसांशी ती आपली नाळ जोडते, त्यांच्या विचारांचे स्वतःमध्ये रूजलेपण ती अभिव्यक्त करते. त्या संदर्भात कवीची 'भूपाळी' नावाची कविता तपासता येईल. तिचा स्वभाव, तिचा कल, तिची मांडणी, तिचे व्यक्तपण, तिचे साक्षेपण, तिचे प्रेरकतत्व अनुभवता येईल ते असे,

**'या मातीत, मातीत भावंडे ज्ञानेश्वर खेळला**
**या मातीत, मातीत नामदेव — तुकोबा नाचला**
**या मातीला, मातीला राजे शिवरायांनी हसविली**
**या मातीशी, मातीशी आम्हा मायलेकरांचं नातं'**
पृ. १३

बालपणीचा संस्कार व्यक्तीच्या सार्वभौम असण्यावर प्रश्नचिन्ह उभे करीत नाही. कारण ते त्याचे असतेपण कोणत्याही कालखंडाला पचवता येत नाही. कारण तो त्याच्या वेळेपणा असतो. कवी आपल्या विचारांची पावती, त्याची बांधीलकी या संग्रहाच्या अर्पण पत्रिकेत जाहिर करतो. त्यामुळे त्यांच्या कविविषयक भूमिकडे पाहण्याच्या संशयाचे सारे बंध तुटून पडतात. संतांच्या भूमीशी आणि पराक्रमाच्या ऊर्मीशी कवीचे असलेले नाते समग्र इतिहासाला दृश्य स्वरूपात जागे करून सोडते. ज्ञानोबांच्या भक्ती परिमळाने आनंदाच्या तळापर्यंत घेतलेला सूर, सामाजिक स्वास्थ बिघडल्यामुळे अंतःकरणात झालेली कालवा—कालव, अस्मितेच्या टप्प्यापर्यंत आणून सोडणारा निर्धार याच मातीतून प्रसवला. आपल्या जीवनाच्या धन्यतेवर शिक्कामोर्बत करणारा कवी बेभान होऊन त्याचा आस्वाद घेत जातो.

कवीची भूपाळी झोपलेल्यांना प्रवर्तनाची चाहून करून देते. कारण नेमके तत्त्व कविता जर सोडून स्वैर होत गेली तर ती कविता असण्यापासून तुटायला लागते. सांधणे हा तिचा प्रकशतीधर्मच असायला पाहिजे. 'भूपाळी' ही भक्तीतून अंतःकरण शुध्दीचा तर शक्तीतून असलेपणाचा जरब व्यक्त करते. संस्कशतीचे तीव्र भान वाघमारेंची कविता अत्यंत सरळतेने वयक्त करीत जाते. त्यांच्या शब्दांचा साधेपणा त्यांच्या प्रकशतिधर्माच्या सामर्थ्याच्या शक्यता निश्चित करतो. एकाच वेळेस त्यांची कविता प्राचीनतेपासून आधुनिकतेपर्यंतचा व तेथून पुढे जागतिकीकरणापर्यंत पल्ला गाठते. त्यातील

खाच खळग्यांवर, माणसांच्या दूर्भाग्यावर ती भाष्य करते. माणसांना कर्तृत्वहीन करणारी माणसांची दिवाळखोरी त्यांच्या कवितेचा आधार घेते. स्वातंत्र्यापूर्वीची आग स्वातंत्र्योत्तर काळात स्वत:चेच घरे शिलगावू लागली. तिच्या धगीने कवी व्यथित होऊन बोलू लागतो. 'ज्याला तुम्ही सूर्य म्हणत्यात' या कवितेतील उभा झालेला मानवतेचा सवाल अस्थिर करतो. कारण माणूस असणाऱ्या गावाचे चेहरे कधीच उजाड होवून गेलेत. त्या चेहऱ्यांचे स्मरण कवी ठेवतो.

**'या गावाचं बिऱ्हाड, त्या गावी टाकल्यात**
**भटक्याची जिंदगी, हेलपाटेच खात्यात**
**विषमतेच्या बाजारात हक्काचे बी लिलाव होत्यात**
**काय राजे हो, समतेचं गीत गावाच म्हणत्यात..**
**.'** पृ. २८

मानवमुक्तीच्या संघर्षाचे बीज हे प्रत्येक कालखंडात संघर्षात राहिलेले आहे. स्वातंत्र्य हा प्रत्येकाच्या जगण्याचा संदर्भ म्हणून लक्षात घेतलेला आहे. त्या संदर्भाला अवरूध्द करणाऱ्या मतप्रवाहाच्या समोर समाज उभा ठाकल्याचे दाखले नवे नाहीत. स्वातंत्र्यपूर्व कालखंडामध्ये स्वातंत्र्योत्तर कालखंडाचे आराखडे निश्चित करण्यात आले. परंतु स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये त्या आराखड्यांना पान्हेच फुटले नाही. केवळ अजागळ स्तनच तेवढे मिरविल्या गेलेत. गोऱ्यांच्या खाणाखुणा मिटवून काळ्यांच्या शासनाची बैठक पोक्त करण्यात आली. परंतु सामान्यांच्या तोंडाला पानेच पुसल्या गेलीत. त्यांच्या जीवनाचा तळतळाट उपेक्षाच भोगत आल्या. सामान्यांच्या गरजा माणूस म्हणून सोईस्कर नाकारल्या गेल्यात. उदरभरणाचे कार्यक्रम राजरोसपणे मोठ्या सन्मानाने आयोजित केल्या जावू लागते. स्वत:च्या पिढ्यांच्या भविष्याचे पाळेमुळे भक्क करण्यामध्ये स्वातंत्र्य राबविल्या गेले. यात आदिवासी धूसर झाला. कष्टकरी शोषल्या गेला, राबविला गेल्या, प्रसंगी नाकारल्या गेला. विषमतेच्या बाजारात समता बेभाव विकल्या गेली.

स्वातंत्र्यावरील उडालेला विश्वास कवीला कुठेतरी अंतर्मुख करून सोडतो. अशावेळी कवीची कविता सामान्यांची साथीदार बनून त्यांचे असलेपण शासकांच्या पुढ्यात मांडते. ही तिला आपली जबाबदारी वाटते. नकली सभ्यता बाळगलेल्या माणसांना ती नाडं करीत नाही. तर आशावादाच्या शक्यता ती जिवंत ठेवते. कारण जिवंतपणा हाच तिचा स्थायीभाव असतो. ते आपल्या कवितेला या साऱ्या चेहरे हरविलेल्या जगात राबवितात. मूलभूत गरजांच्या गोष्टी सुटल्याची बतावणी भाषणांमधून केली जाते, तेव्हा तिही जीवनाची जीवनाकडून होणारी प्रतारणाच म्हणावी लागते. अशावेळेस अभावग्रस्त समाजाचा उद्गार ऐकून घेणं किती आवश्यक आहे याचे रास्त भान कवीला असलेले जाणवते. आपल्या 'सूर्यफूल', 'हवेली', 'रगतपिती', 'पहारेकरी' या कवितांमध्ये ते तो उद्गार व्यक्त करतात. त्यांच्या चिंतनाचा एक फेरा पूर्ण होतो. ते म्हणतात,

'कोमल प्रतिभेचं सूर्यफूल
सूर्याच्या दिशेने फुलत होतं
येणाऱ्या किरणांची वाट
झोपडीतल्या अंगणातून शोधत होत.'

किंवा

'आता एकही झोपडी राहणार नाही येथे
जगाच्या नकाशावर गुलाबी शहर उदयास येते.'

किंवा

'लाज नाही लज्जा नाही
नाही कुणाची भीती
रात्रंदिन शोषण करती
झाली असूरी रगतपिती'

किंवा

'आमचेच कष्ट अन् आमचाच घाम
आमचेच हक्क लिलावात कसे?'

सामाजिक पर्यावरणाचा विचार करताना विविधतेच्या पटलावर प्रस्थापितांची सत्ता प्रतिष्ठित झालेली पाहायला मिळते. याचा अर्थ असा नव्हे की, नैसर्गिक बैठकीची पायमल्ली व्हावी. निसर्गत: प्रत्येकाचे स्वातंत्र्य वेगळेपण मान्य केलेले असतांनाही त्या स्वातंत्र्याचा संकोच व्हावा व या धरतीच्या लोकांना आपण कोण? असा प्रश्न पडावा हे समाजाचे दुर्दैव म्हणावे लागते. 'बळी तो कान पिळी' या विचाराला कोसो दूर सोडून जर प्रजासत्ताकाला आपण स्वीकारतो म्हटले तर कोणत्या शतकात आपण वावरतो आहोत. हा प्रश्न उभा राहतो. सामान्यांच्या उद्गाराला भाकरीच्या तुकड्याने दुर्लक्षित करणाऱ्या या निर्माण झालेल्या

व्यवस्थेला कवी सातत्याने प्रश्न करतो. काय बघावे, चिंतन करावे आणि काय लिहावे हा त्या त्या कलावंताचा मानसिक व्यवहार असतो. कारण जो त्या कलाकृतीची निर्मिती करीत असतो ती काही एकदमच वेगळी नवी असते, असे म्हणता येत नाही. त्याचे कारण ज्या वातावरणामध्ये तो वावरत असतो, त्या त्या वातावरणात त्याच्या कलाकृतीमध्ये होणाऱ्या बाबी कमी अधिक प्रमाणात काही कलाकृतीमध्ये आलेल्याही असतात. परंतु त्या बाबींशी बांधिलकी असल्याने त्यांच्यापासून तो दूर राहू शकत नाही. मग त्या कलावंताची कलाकृतीही पूर्वसूरींचे कित्ते गिरवू लागते. त्याचे कारण त्याच्या प्रसिध्दीचे चित्र त्याच्या समोर ताजेच असते. जर असे झाले तर कलावंताची कलाकृती फार मोठा पल्ला गाठायच्या आधीच स्वतेतरांच्या चेहऱ्यांमध्ये हरवून जाते. तिचा स्वत:चा गंध, रूप, आकार, ठेवण शिल्लकच उरत नाही. वाघमारेंच्या कविता पूर्वसंस्कारांच्या पलिकडे जातात. आपलेपण जपताना दिसतात. सभोवतालचे चिंतन त्या व्यक्त करतात. नाहकची कवितेची लांबी, रूंदी वाढविण्याच्या नादात ते पडत नाहीत हा एक वेगळा स्वभावधर्म त्यांचा ठरतो. या संदर्भात त्यांची 'थवा' नावाची कविता लक्षात घ्यावी लागते.

**'समतेचं गीत गात निळ्या पाखरांचा थवा**
**पिंपळ सावलीत थांबला**
**आणि पुढील लक्ष गाठण्यास, निळ्या आकाशात म्होरक्यांच लक्ष आमराईकडं मोहारलं आणि थवा विखुरला'**

पोटाचा प्रश्न सोडविण्यासाठी संघर्ष ही गोष्ट अटळ आहे, हे मान्य केल्याशिवाय पर्याय नसतो. कारण भूक ही सनातन असते. तिचा आकार, तिचा स्वभाव, तिचा वेग, तिची आग इथून सारखीच असते. हे ही मान्य करावे लागते. परंतु ही आग माणसांची ओळख जी अथक प्रयत्नांनी तयार झालेली असावी, ती भस्मसात करून टाकणारी असेल तर 'भूक' ही अमानवी आहे हे स्पष्ट होते. भूक ही चिंतनाच्या, त्यागाच्या, परिश्रमाच्या, भोगलेपणाच्या इतिहासाला बेईमान होणारी नसावी, नाही तर भूकेचा संघर्ष बेगडी वाटतो. भूक ही मग नेतृत्व देवू शकत नाही. वैचारिक चळवळीला सामर्थ्याने पेलू शकत नाही, कारण, पेलणे हा तिचा दाखवेपणा ठरतो. गरजांच्या पूर्तीची समृध्दी जर सभोवतालच्या जगण्यात दिसू लागली तर विद्रोहाच्या मशाली चांदण्यांच्या गारव्यालाही लाजवून टाकतात. या कृतीतील वैफल्यग्रस्तता, निराशा, प्रसंगी राग, कवी अत्यंत संयमाने आपल्या कवितेमध्ये व्यक्त करतो. कोठेही आक्रस्ताळेपणा नाही व्यवस्थेला प्रश्न करणाऱ्या नेतृत्वाच्या समोर आहे ते मांडून उत्तराची अपेक्षा करीत ती पुढच्या प्रवासाकडे पाहत राहते. इथे कवीच्या चिंतनाचे क्षेत्र केवळ एकच न राहता ती समाजामध्ये मुक्त विहार करते व अडथळ्यांचा थांबा यावा तशी ती थांबते व व्यक्त होते. त्यानंतर समाजाला प्रश्न करते. त्या संदर्भात 'आर्तहाक' ही कविता विचारात घेण्यासारखी आहे.

**'वाटे मना कधीचेच तुझया कुशीत यावे**
**युगानुयुगे माते पान्हा तुझाच प्यावे**
**मुलगा असो वा मुलगी**
**'आई' हा शब्द ओठी**
**स्वप्न तुझे उद्याचे घेवून मी ग येईन**
**अगणित तारे यशाचे पदरी तुझ्याच देईन'** पृ. ३५

सृजनाच्या अंगाने 'स्त्री' ही शक्तीच्या स्वरूपात अधोरेखित करावी लागते. हे मान्य असूनही पुरूषप्रधान समाजाचे पर्याने कमी अधिक स्त्रीप्रधान समाजाचे उपयुक्ततेचे संदर्भ तपासून घ्यावे लागतात. कारण या संदर्भाना गढूळतेचा रंग यायला लागलेला असतो. त्यामुळे सारे समाजमनच कर्मकरंटे व्हायला लागते. पुरूषत्वाला स्वीकारणारा विचार जेव्हा — जेव्हा प्रकर्षाने समोर यायला लागला तेव्हा — तेव्हा स्त्री शक्तीकडे झालेले दुर्लक्ष विचार करण्यासारखेच होते. या संदर्भात २१ व्या शकतकातील व्यक्तीच्या अहंगडाला तपासत असताना भ्रूणहत्येचे गूढ उकलल्या जाते. कवी समाजातील 'स्त्री' अस्तित्वाचे धोके आपल्या 'आर्तहाक' या कवितेमध्ये सूचवीत जातो.

स्त्री पुरूष समानतेचा विचार साठोत्तरी म्हणजेच स्वातंत्र्योत्तर कालखंडात प्रकर्षाने केल्या गेला, असे म्हणता येणार नाही. ताराबाई शिंदे ज्या फुल्यांच्या तालमीत तयार झाल्या त्यांनी तो आपल्या 'स्त्री — पुरूष' तुलना या ग्रंथामध्ये करून ठेवला आहे. त्या

आधीही या विचाराचा धागा आपणास नेता येईल. परंतु या दशकाने व्यक्तिस्वातंत्र्याचे वेगळेपण मोठ्या सन्मानाने स्वीकारले त्यामुळे स्त्रियांना आपल्या चांगल्या वाईटांचा विचार करता आला. शिक्षणाने वैचारिक क्रांतीपर्यंत स्त्रियांना आणून सोडले. त्यामुळे त्या आपल्या शोषणाचा इतिहास तपासू लागल्यात. परंतु असे करीत असतानाच त्यांच्या सक्षमीकरणाची गरज वाटायला लागली. ती अवलंबून आहे हे तिच्या मनावर बिंबविल्या जावू लागले. त्यात तिचा कोंडामारा होवून ती स्तंभित होवू लागली. त्यातून तिचे निर्णय स्वातंत्र्य हिसकावून घेवून तिच्या अस्तित्वावर प्रश्नचिन्ह उभे राहू लागले. शासकीय शक्तीची भीती दाखविल्याने मानसिक सनातनी संघर्ष आणखी चिघळतो व त्याचे पर्यावसान अमानवीय प्रवृत्तीमध्ये होते. याचेच फलित भ्रूणहत्या म्हणता येईल. २१ व्या शतकाच्या पहिल्या दशकात या प्रवृत्तीने डोके वर काढून किती उत्पात माजविला आहे, हे कवी वाघमारे आपल्या कवितेत दाखवितात.

'सूर्यफूल' या संग्रहामध्ये काही कविता या प्रयत्नवादातून आशावाद उभा करतात. कवीची जीवनावर असलेली अपार श्रध्दा त्यांना माघारी फिरवत नाही तर भविष्याचे स्वप्न विणायला ती प्रवृत्त करते. परंतु सभोवतालचे बदलू पाहणारे हवामान ते दृष्टिआड करीत नाही. आपल्या कवितांमध्ये अत्यंत सहज उकलतील अशा समानुभवी प्रतिमा ते पेरत जातात. ज्याचा अर्थ जुळविण्याची दमछाक वाचकाला करावी लागत नाही. जसे — 'लोकशाहीचा काला' या कवितेत ते वास्तवावर मार्मिक भाष्य करतात. व त्याच्या कारणपरंपरेचा विचार वाचकांना करायला भाग पाडतात.

**''जिकडे पाहावे तिकडे सारे भोकंच भोकं**
**अन् पाऊस पाडायला आले**
**म्हणे प्रस्थापित पांढरं धुकं' पृ. २४**
**किंवा**
**मी**
**माझ्या मेंदूच्या ध्वनिफितीत**
**संकलित करीत आहे**
**अर्धपोट्या केविलवाने शब्द**
**कोरड्या ओठांवर हसू फुलावे म्हणून**
**उज्ज्वल उद्यासाठी..पृ. १५**

खऱ्या अर्थाने ही कवीची भूमिकाच असते कारण त्याला एकांताच्या इमल्यात स्वस्थ बसता येत नाही. त्यासाठी तो व्यक्त होत असतो. त व्यक्तपणाचा सांधा आपणास त्याच्या समाधानाशी जोडता येत नाही. स्वसुखाशी लावता येत नाही. तर त्याला आपल्याला सार्वकालिकतेकच्या विवंचनांशी, शोषणाशी वेदनांशी, अबोलतेशी जोडावा लागतो. वाघमारेंच्या कविता याच्याशी साधर्म्य साधताना दिसतात. परंतु त्यांच्या मर्यादांचाही विचार त्यांच्या 'सूर्यफूलात' दिसून येतो तो म्हणजे विस्ताराच्या बाबतीत या कविता गतीमान होण्याच्या टप्प्यावरच थांबतात. असे असले तरी एवढ्यामुळेच त्यांची पकड सैल होत नाही तर, तो कविचा वेगळेपणा ठरतो. अत्यंत मोजक्या शब्दांत ते कविता उभी करून परिणाम घडवून आणतात.


❑❑❑

ISSN 2394-5303

# Printing Area®

Issue-78, Vol-03, July 2021

Peer Reviewed International Multilingual Research Journal



Editor
Dr.Bapu G.Gholap

14) नवे शैक्षणिक धोरण २०२१ एक अभ्यास
**प्राचार्य डॉ.शेख एस.जे, जि. जळगाव** ||68

15) डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सामाजिक लोकशाही
**प्रा.डॉ. अर्जुन सोनाजी उबाळे, जिल्हा औरंगाबाद** ||71

16) भारतीय लोकशाही आणि लोकशाहीचे बदलते स्वरूप एक अभ्यास
**डॉ. बंजारा दिलीप लालू, जिल्हा लातूर** ||76

17) महात्मा गांधी यांचे हिंदू-मुस्लीम ऐक्या संबंधी विचार
**प्रा.डॉ. गालफाडे ए.बी., जि.बीड** ||81

18) योगशास्त्राची वर्तमान काळातील भूमिका
**डॉ.दीपक भगवानराव दिरंगे** ||83

19) बंदीशीतील भाषा काव्य संस्कृती यातील समन्वय
**प्रा.डॉ. किशोर निळकंठराव देशमुख, अकोला** ||85

20) गतकालीन आनंदोत्सवाला भिडणारी कविता : परतीचे ऋतु
**प्रा.डॉ. विनोद नामदेव इंगळे, जि. बुलडाणा** ||90

21) पंचायत क्षेत्र विस्तार कायदा १९९६ (पेसा) तरतुदींचे लोकांमध्ये झालेल्या जाणीव...
**चेतन भा. नंदरधने, मुंबई** ||93

22) लोककला : लोकानुरंजन व समाज प्रबोधन
**डॉ.प्रा. सोपान माणिकराव सुरवसे, बीड** ||101

23) मीडिया : साहित्य और बाजार
**डॉ. मुक्ता चतुर्वेदी, मथुरा** ||104

24) स्वतंत्रता के पूर्व जनजातीय महिलाओं के सशक्तिकरण का प्रयास
**दयानन्द कुमार यादव & प्रवीण कुमार, हजारीबाग** ||107

25) शिवानी के उपन्यासों में धार्मिक समस्याएँ
**आहिर धर्मेशकुमार डी., सूरत** ||110

26) राहुल सांकृत्यायन की जीवन-दृष्टि
**सुखडिया धर्मेश पी., राजकोट** ||114

आहे.

हिंदुस्थानी संगीतातील जो कलाकार आत्मशोधाच्या साधनेस प्रवृत्त होतो त्याला या संगीतातील बंदिशीचे अनुसंधान प्राप्त होऊ शकते कारण बंदिश म्हणजे ''एकजिन्सी मूस'.'' गायन वादनाच्या अविष्काराला हे रूप जेंव्हा प्राप्त होते तेव्हाच त्याची बंदिश जमते. सच्चा कलाकार ही बंदिश प्राप्त करण्यासाठी जीवनभर प्रयत्नशील असतो आणि रसिक जण अशी बंदीश आस्वादण्यासाठी आसुरलेला असतो. अश्या सिध्दीप्रत पोचलेल्या बंदिशीमध्ये संगीताची भाषा त्यातील काव्यात्मक पक्ष आणि त्याला मिळालेला भक्कम सांस्कशतिक आधार या त्रिगुणांची एकजीवता झालेली असते अशी बंदीश ही हिंदुस्थानी अभिजात संगीताची अंतीष्ठ फलश्रुती आहे.

**संदर्भ :**

१. संगीत कला विहार, ऑगस्ट १९९९.
२. संगीत कला विहार, नोव्हेंबर १९८९.
३. संगीत शास्त्र– डॉ. वसंतराव राजोपाध्याय.

❑❑❑

**20**

# गतकालीन आनंदोत्सवाला भिडणारी कविता : परतीचे ऋतु

**प्रा.डॉ. विनोद नामदेव इंगळे**
ग.भि. मुरारका कला वाणिज्य महाविद्यालय, शेगांव,
जि. बुलडाणा

**********

प्रतिमेच्या अंगाने अवतरणारी कविता वाचकांच्या अंगाने नेहमी उत्सुकतेचा विषय राहिलेली आहे. कवितेच्या मांडणीमध्ये अवतीर्ण होणारी ती, शक्यतांच्या अनेक सुक्ष्म जागा निर्माण करते, आणि ही बाब खऱ्या अर्थाने वाचकाला, अभ्यासकाला एकप्रकारे दिलासा देणारी अशीच असते. याच प्रतिमेच्या आधाराने किंबहुना तिच्या मागे दडून कवी किंबहुना प्रतिभावंत हळुवारपणे लिहिता होण्याचा प्रयत्न करतो. ही प्रतिमा त्याच्या भावस्पंदनांना नेमकं टिपण्याचं बळ मुळातच घेऊन येते. त्यामुळे तो अगदी तल्लीन, निर्धास्त होतो. अर्थात तिच्या अस्तित्वाशिवाय त्याला किती व्यक्त होता येते हा प्रश्न असतो. पण शिष्टसंमत समाजाच्या ठाशीव पायंड्यानुसार असे नाहक प्रश्न उभे करणे क्रमप्राप्त नसतात. त्यामुळे कवी हा आवेगाने पुढे येतो आणि सांगू पाहतो ते, जे आपण सहज म्हणून स्विकारून नाकारलेलं असते. ही बाब कधी समष्टींच्या दुःखाच्या परिघाशी निगडीत असते तर, कधी 'स्व' च्या या दोन टोकांच्यामध्ये असणारा जो अवकाश म्हणता येईल तो, कविला समग्रतेपर्यंत पोचवत असतो. सदानंद सिनगारे यांच्या कवितेच्या शैलीच्या संदर्भात आपणास असे सहज म्हणता येईल. त्यांची बैठक, घडण, एकंदरीत संस्कार, मग हे संस्कार कोणते? स्वकियांनी घातलेले की, आपणच आपल्याला सामाजिक पर्यावरणाला मान्य असणाऱ्या नीतीनुसार, नियमानुसार या काही त्यांच्या व्यक्त झाल्याच्या खुणा आपणास सापडत जातात. 'परतीचे ऋतु' हा त्यांचा काव्यसंग्रह साठ कवितांना

सोबत घेऊन वाचकांच्या भेटीला येतो. विषयाचे वेगळेपण निश्चितच जाणवते. अनेकदा एकच विषयाला वेगळ्या अंगानं कसे मांडले जाते याचे कसब त्यांची कविता वाचल्यानंतर लक्षात आल्याशिवाय राहत नाही. शेवटी कविला अभिप्रेत काय? या बिंदूपासून ही कविता प्रारंभ पावते.

माणूस स्वत:वर प्रेम करायला लागला की, त्याच्या इतरांवर प्रेम करण्याच्या कक्षा रूंदायला लागतात. आपली माणसे आणि त्यांच्या वातावरणात सहभागी होणारी ती–ती सर्व त्याला हवीहवीशी वाटू लागतात. जणू हे मंतरलेलं वातावरण ज्यात स्नेह आहे. जिव्हाळा, ओलावा आहे. जीव ओवाळून टाकण्याची तयारी आहे हे सर्वकाही नाहीसे होऊ नये याची मनिषा तयार होऊन ती वर्तमानात तयार होणाऱ्या साऱ्या आव्हानांशी दोन हात करण्याची तयारी ठेवते. पण वेळेला कोणी थांबवू शकत नाही हेच खरयं. हे कविला सुध्दा अगदी मन:पूत समजते. परंतु या गोतावळ्यास सोडण्याची भावदृष्टी ते तयार करू शकत नाही. हेरेकाला जो संवेदनशील आहे त्याला हे भावविश्व सोडावेसे वाटत नाही. परंतु बदल, परिवर्तन हे जीवनाचे, जिवंतपणाचे सूत्र आहे हे नाकारून कसे चालेल? याचे भान कवी व्यक्त करतो, परंतु त्यासोबतच आता ते सर्व नसल्याचं दु:ख, मनस्ताप, त्यांच्या कवितेतून सुटत नाही. बदलाच्या साऱ्या संवेदनांना ती रेखाटते.

'परतीचे ऋतु' ही कविता अनेक विषयांना घेऊन वेगाने शेवटच्या कवितेला भिडते. तिचे असे भिडणे म्हणजे कर्तव्यमुक्ततेसाठीची जागा निर्माण करणे नव्हे, तर सर्वांगाने परिपूर्णतिचा प्रत्येक कवितेला न्याय देण्याचा उत्तुंग प्रयत्न आहे. सदानंद शिनगारे बहुतांश भूतकाळात वर्तमानाला कोंबण्याचा प्रयत्न करतात. याचा अर्थ असा काढण्याची शक्यता निर्माण होते की, जन्माला आलेलं नवं पर्यावरण, ज्याला आपण अधिकाराने जागतिकीकरण असे म्हणू ते फारसं पचनी पडल्याच जाणवत नाही आणि मग कवी त्याची तुलना आपल्या गतकालीन सुखासीन क्षणांशी करायला लागतो. अशा कवितांचा एक फार मोठा वर्ग त्यांच्या या काव्यसंग्रहामध्ये आहे. 'कांक्रीटचं जंगल' या कवितेतील काही अंश त्यानिमित्ताने पाहता येतील.

'बेटा,
तू लहान असतांना
याच अंगणात शेणसडा घालायची
तुझी आई.
तू दुडूदुडू धावायचास तेव्हा, घालायची चिमण्यांना दाणे.
आताशा
चिमण्याही उतरत नाहीत, या कांक्रीटच्या अंगणात!
पूर्वीसारख्या.'

परिवर्तन अनिवार्य आहे. त्याच्या वेगाला थोपवण्याचा प्रयत्न केल्यास तो आपणास बाद करून सोडतो. एक संवादीपण ही कविता उभं करते. ती सहज व्यक्त होते. जे पाहते, जे जाणवते, व्यक्त करते. प्रत्येकाचा भूतकाळ हा वर्तमानातील त्राग्याच्या तुलनेत आनंददायी असतो. असे आपण मानायला हरकत नाही. वातावरण बदललय ही प्राथमिक खंत व्यक्त होत असली तरी मुळ बाब माणसे बदलत आहेत हे खरं दु:ख कविचं आहे. बदलाच्या गतीप्रमाणेच माणसेसुध्दा गतीमान होऊन व्यापताहेत कांक्रीटची जंगलं आपलं अस्तित्व उभं करण्यासाठी आणि याच उत्कर्ष बिंदूपासून एका नव्या दुनियेला तरूण पिढी निर्माण करू पाहत असेल त्यात गैर काय? हा प्रश्न निर्माण होतो. तसा पिढ्यांचा संघर्ष हा अनंत आणि अनादी आहे. आपण आपल्या वाट्याला आलेल्या त्या काळातील वातावरणाचे प्रतिनिधित्व करतो एवढेच. 'कांक्रीटचे' हा शब्दच मूळी अस्सल कृतिमता पेश करणारा आहे. भावनाविवश असणाऱ्या माणसाला या परिघात कपाळमोक्ष करून घेतल्याशिवाय काहीच उपलब्ध होण्याची जागा शिल्लक उरत नाही. इथे अस्वस्थता आहे परंतु पूर्णांशाने नाकार नाही. कारण त्या नकारासाठी कवी आपलं विश्व निर्माणच करीत नाही. याकडेही लक्ष जाणं गरजेचं आहे. पर्यायाने नव्या पिढीच्या विकासाची, भरभराटीची प्रक्रिया याच अस्वस्थ कप्प्यात सुरू होते. परंतु एक हलकीशी का असेना हळहळ ठणकत जाते कवितेच्या अंगभर.

'दृष्टीच्या नेटवर्कच्या रेंजमध्ये' या कवितेला अभावग्रस्त माणसांच्या यातनांचे दु:ख अनुभवता येते. त्यांचे खपाटी गेलेले पोट, गारगोट्या झालेल्या डोळ्याच्या

बाहुल्या शक्तीपात झालेली, खंगलेली शरीरं आणि वेगाला थांबवू पाहणारी व्यर्थ असहायता, धडपड कवी या माणसांचं जग जगतो आहे. त्यांच्या स्पर्शांना नाकारनं त्याला बेईमानी वाटते. कवीच्या आतबाहेर चालणारा उत्पात कमालीचा अस्वस्थ करणारा आहे. ते म्हणतात,

'दिवसाला दिवसांची
ठिगळं जोडणारी माणसं
त्यांनी ढकललेले अर्धपोटी दिवस? त्यांची
कुपोषित बालकं, उध्दवस्त चूली
आणि त्यांच्या सामुहिक आत्महत्या?'

'भूक' ही एक वैश्विक व्यवस्था आहे. अनेकांना या व्यवस्थेचे धनी होता येते. नाहीतर त्यासाठी आकांत मांडावा लागतो. नव्वदोत्तरी कालखंडात ही भळभळणारी जखम आणखी जीवघेणी होऊ लागली आहे. झालेल्या अनेक सत्तातरांच्या अंतरंगात धडधडणारा अग्नी हा भूकेचाच आहे. दलित कविंनी या भुकेला अस्तित्वाचं नाव देऊन वैश्विक ठणक व्यक्त केली. सदानंद शिनगारे त्याच व्यवस्थेचा एक महत्त्वपूर्ण भाग होण्यासाठी धडपडतांना त्यांची कविता दिसून येते. माणसांच्या दिवसाचा आरंभ ते त्याचा अंत हा भुकेचा चेहरा होऊनच व्यक्त होतो. ही भूक वेगवेगळ्या पातळ्या सर करते. कुठल्याही एका नावाने तिच्यावर शिक्कामोर्तब करता येत नाही. या भूकेचे नामकरण आतड्यांना पिळ बसणारी नारायण सूर्वेसारखी दिलदार माणसेच नेमकं करू शकतात. बाकीच्यांसाठी ती केवळ एक नित्यक्रम असते.

नव्वदोत्तरी कालखंड ज्या आशयसूत्रामध्ये हात घालतोय त्याची वेगवेगळी अभिव्यक्ती आहे. त्याचे प्रतिकात्मक रूपे वेगळी आहेत. नव्याचा ध्यास तसेच जुन्याचा उबग नवोदितांच्या एकूण कश्तीच्या अंगाने दिसून येतो. इथे केवळ वाताहत आहे असे नाही तर, नव्या संधी नवागंतांना खुणावतातही. पण हे वातावरण त्यांच्या समग्र कुटुंबाच्या समाधानाचा विषय होऊ शकत नाही याची प्रचिती नव्वदोत्तरी कवितेमध्ये जाग–जागी येत रहते. या कालखंडामध्ये अधिकाधिक चिंतन जर कोणत्या क्षेत्राचे झाले असेल तर, ते शेतकरी आणि त्याची इतरांना जगवणारी शेती. या शेतकऱ्याने वेगवेगळ्या कथा, कादंबऱ्या आणि कवितेच्या पानांना समृध्द केलं. त्यातूनच लेखक–कवी सुध्दा समाधान पावला. त्याला नाव, पद, प्रतिष्ठा प्राप्त झाली. शेतकरी मात्र खाऊजाच्या चकात अडकून मातीमोल झाला त्याची विवंचना सर्वसमावेशक करण्याचा प्रयत्न सदानंद शिनगारे यांनी आपल्या 'बळीराजा' या कवितेतून समर्थपणे केला आहे. ते म्हणतात,

'बळीराजा, तू जगपोशिंद्याची झूल घेऊन
सर्वामुखी घास भरवत असतो
खपाटलं पोट झाकून ठेऊन
तू उपाशी मरत असतो!
तसं पाहयलं तर
तुही रोजच हत्या होत असते
तू रोजच थोडा थोडा मरत असतं!
मग ही आत्महत्या कशासाठी?

शेतकरी आत्महत्येने समग्र ग्रामीण भारतच नव्हे तर संपूर्ण राष्ट्र हादरून गेले. ही एक नवी परंपरा होती. फुल्यांच्या 'शेतकऱ्याचा आसूड' मध्ये आलेला शेतकरी शोषित होता. त्याची अवस्था दयनीय होती. तो ज्ञानाच्या प्रांतापासून तोडल्या गेला होता. धर्माच्या नावाने त्याचे लचके तोडल्या जात होते. त्याची कातडी लक्तरांशी संघर्ष करीत करीतच वाट जरठ होत होती. परंतु या आत्मघातकी परंपरेला त्याने आपल्या पर्यावरणातही घुसू दिले नाही. अभावग्रस्त वातावरणाला पचवणारा तो आणि जागतिकीकरणाच्या सर्वकाही मिळू पाहणाऱ्या जगात ते मिळत नाही. म्हणून मनस्ताप करून घेणारा शेतकरी, यातील फरक स्पष्ट होतो. आणि शेतकरी आत्महत्या ही परंपरा जन्म पावते. त्याची कारण परंपरा शोधणे मग क्रमप्राप्त ठरते. नवोदितांनी आपल्या कथा, कादंबऱ्या, कवितांमध्ये ती अगदी जोरकसपणाने मांडली ही जोरकसपणाने अभिव्यक्त होणारी लेखनी ग्रामीण समाजातच लहानाची मोठी झालेली होती. हे विसरता येणार नाही. 'भक्तीचं फेवीकॉल' या कवितेत कवी म्हणतो,

'विठोबा,
भक्तांनी डोकं ठेवून ठेवून
तुझे पाय झिजवलेत.
डोळे भरून पाहू म्हणतो, रूप तुझं वावरातलं
चांदण्यानं मढवलेल्या जोधळ्याच्या शिवारातलं
पण
लेकुरवाळा म्हणविणारा तू, भक्तांच्या मेळ्यात रमतोस
तू
फिरकलासच नाहीस आमच्या
**अवर्षणग्रस्त शिवारात आजकाल.'**

आशाळभूतपणाने वावरणारी माणसे आपला

राग, दु:ख, वेदना कुणाकडे व्यक्त करतील हा प्रश्न कवी सातत्याने उपस्थित करतो. 'कालचा पाऊस आमच्या गावात आलाच नाही, सदरहू पीक आम्ही आसवांवर काढले' ही जी ठणक आहे, उपेक्षेचा सनातन चेहरा आहे तो इथे जरी जाणवत नसला तरी, त्या दिशेने वळणारी अभिव्यक्ती आहे. विठ्ठलाला साकडे घालणारा शेतकरी जेव्हा दिवसा—ढवळ्या भ्रमनिरास होतो तेव्हा मानवतेचा माथा तप्त होण्याचं वातावरण तयार होते. ही स्वाभाविकता आहे. नैसर्गिकता आहे. न जाणवणारा परंतु पूर्णाशःने उध्वस्त करणारा जो सामाजिक ताण आहे तो शेती आणि त्यात राबणाऱ्या शेतकऱ्याला कवडीमोल करणारा ठरतो. कवितेने शेतकऱ्याला त्याच्या भल्या—बुऱ्या स्वभावासहीत मांडतांना निदान सुसंस्कृततेचा आव आणू नये. एवढी कविकडून माफक अपेक्षा करायला हरकत नाही. सिनगारेंची कविता या कसोटीवर खरी उतरते. शेतकऱ्यावर खरचं आत्मियतेनं कुणी का बोलत नाही हे कवी मांडत जातो.

सदानंद सिनगारे अनेक विषयांना हात घालत त्याचे पापुद्रे हळूवार उलगडतांना दिसतात. त्याचे एक महत्वपूर्ण रूप म्हणजे त्यांची 'मुलगी' ही कविता

'पहिलीच झाली मुलगी
कुणी म्हणालं, पहिली बेटी
धनाची पेटी, तूप रोटी,
मी म्हणालो, बाई काय म्हणू तुला?
ती म्हणाली, नावात काय आहे बाबा?
जमलं तर एवढं करा
वेदनेशी नाळ जुळली कायमची
ती जरा कापून घ्या
फरफटीची झोळी माझी, आता तरी काढून घ्या.'

ज्योतीबांच्या साह्याने सावित्रीबाईंनी स्त्रीमुक्तीचं गीत लिहिलं. तिला लिहतं, बोलतं केलं. तिला आत्मनिर्भर बनवलं. ती स्वावलंबी झाली. जन्माला आलेला प्रत्येक प्रांत तिच्या अस्तित्वाची दखल घेऊ लागला. परंतु हळूच कुठेतरी तिच्या सक्षमीकरणाच्या गोष्टी सुरू झाल्या व तिला केल्या गेले अस्वस्थ. ती स्वत:लाच प्रश्न करू लागली. स्वत:वर शंका घेऊ लागली त्यातून तिच्या साऱ्या उमेदी झाकोळल्या गेल्यात व ती होऊन गेली बंदिस्त समाजात. कवी तिला न्याय देत नाही तर आपली भूमिका मांडतात. माणूस या नात्याचा परिचय करून देतात. हा त्यांच्या कवितेचा वेगळेपणा दिसतो.

**21**

# पंचायत क्षेत्र विस्तार कायदा १९९६ (पेसा) तरतुदींचे लोकांमध्ये झालेल्या जाणीव—जागृतीचे अध्ययन

**चेतन भा. नंदरधने**
संशोधक, M.A. in Education- 1st year,
टाटा सामाजिक विज्ञान संस्था, मुंबई

***********

**गोषवारा :**

आदिवासी स्व: शासन म्हणून पेसा कायदा आदिवासी विकासास पूरक भूमिका बाजवतो. लोकनीयुक्त प्रतीनिधी तसेच सर्व सामान्य नांगरिकांपर्यंत पेसा कायदा पोहचत नसल्याचे दिसून येते. मारेगाव तालुक्यातील पेसा कायद्याची अंबलबजावणी आणि त्याची परिनामकात समजून घेण्यासाठी हा अभ्यास केला गेला.

**उद्देश :—**

१) पेसा कायद्यातील तरतुदी अभ्यासने.

२) पेसा कायदा तरतुदींचे ग्रामस्तरावरील जाणीव— जागृती अभ्यासने

३) पेसा कायदा अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणेची कार्य पद्धती अभ्यासने.

**स्थान—:** ग्रामपंचायतय लोकसंख्या १)— सराटी — ११०१ २) शिवनाळा — ८०२

संशोधन प्रकल्पासाठी गैरप्रमाणी स्तरीय यादृच्छिक नमूना निवड पद्धतीचा वापर केला आहे. यामध्ये प्रत्येक गावातील गावनिहाय एकूण ५० निवेदकांची निवड करण्यात आली आहे. ५० निवेदक हे सोयीस्कर पद्धत तंत्राचा वापर करून संशोधनासाठी निवडण्यात आले.

संशोधनामध्ये प्रश्नावली चा वापर केला. वैयक्तिक व कौटुंबिक माहिती, पेसा कायद्याच्या जन जागृती बाबतचे प्रश्न, तुम्हाला पेसा कायद्याबद्दलची